www.learningwithsmartness.in

# शिष्यवृत्ती सराव पेपर सातवी

## विषय - गणित घटक - मसावि लसावि गुण 30 गुण

1. दिलेल्या संख्यांचा मसावी काढणे म्हणजे संख्यांच्या विभाजक यांची यादी करून सर्वात..... सामाईक विभाजक शोधणे.
   ① समान ② लहान ③ मोठा ④ यापैकी नाही
2. 27 मीटर लांब व 18 मीटर रुंद असणाऱ्या एका बागेत फुलझाडे लावण्यासाठी मोठ्यात मोठ्या आकाराचे चौरसाकृती वाफे तयार करायचे झाल्यास प्रत्येक वाफा जास्तीत जास्त किती मीटर लांबीचा असावा?
   ① 3 मीटर ② 6 मीटर ③ 9 मीटर ④ 7 मीटर
3. 20 मीटर व 30 मीटर लांबीच्या प्रत्येक दोरखंडाचे सारख्या लांबीचे तुकडे करायचे आहे तर अशा प्रत्येक तुकड्याची लांबी जास्तीत जास्त किती मीटर असावी?
   ① 5 मीटर ② 4 मीटर ③ 6 मीटर ④ 10 मीटर
4. मनीषा जवळ मोगऱ्याच्या कळ्या आहेत; तिने प्रत्येकी 20, 25 आणि 45 कळ्यांचे गजरे तयार केले; एकही कळी शिल्लक राहत नाही तर तिच्या जवळ कमीत कमी किती कळ्या आहेत?
   ① 400 कळ्या ② 300 कळ्या ③ 900 कळ्या ④ 450 कळ्या
5. कवायती साठी मैदानावर मुलांच्या रांगा तयार करावयाच्या आहेत. प्रत्येक रांगेत 30 मुले किंवा प्रत्येक रांगेत 50 मुले राहतील अशा रांगा केल्यास रांगा पूर्ण होतात व एकही मुलगा शिल्लक राहत नाही तर एकूण किती मुले आहेत?
   ① 150 मुले ② 100 मुले ③ 400 मुले ④ 180 मुले
6. रमा, राधा व रचना — रमा दर 10 दिवसांनी, राधा दर 15 दिवसांनी व रचना दर 20 दिवसांनी घरी येते. सगळ्यांनी 25 जून 2019 रोजी शहरात निघून एकसाच दिवशी गेल्या; त्या किती दिवसांनी आणि कोणत्या तारखेला परस्पर भेटतील?
   ① 60 दिवस, 24 ऑगस्ट 2019 ② 100 दिवस, 25 सप्टेंबर 2019 ③ 90 दिवस, 20 सप्टेंबर 2019 ④ यापैकी नाही
7. कृषी विद्यापीठात गव्हाच्या दोन जाती — 3625 kg व 2225 kg उपलब्ध आहेत. जास्तीत जास्त सारख्या वजनाच्या पिशव्या तयार करायच्या असतील तर प्रत्येक पिशवीचे वजन किती व प्रत्येक जातीचे पिशव्यांचे किती होते?
   ① 35 kg, 150 पिशव्या व 50 पिशव्या ② 40 kg, 120 पिशव्या व 60 पिशव्या ③ 25 kg, 145 पिशव्या व 89 पिशव्या ④ 45 kg, 25 पिशव्या व 30 पिशव्या
8. ऐतिहासिक सहलीसाठी इयत्ता 10 वी व 11 वी चे अनुक्रमे 240 व 135 विद्यार्थी गेले. प्रत्येक इयत्तीत समान संख्येचे गट करायचे असतील आणि प्रत्येक गटाला एक मार्गदर्शक पाहिजे. जास्तीत जास्त किती विद्यार्थी प्रत्येक गटात असू शकतील?
   ① 20 ② 25 ③ 15 ④ 35
9. खालील संख्यांचा मसावी (GCD) काढा: 148, 254
   ① 2 ② 3 ③ 4 ④ 7

10. खालील संख्यांचा लसावी (LCM) काढा: 550, 340
① 500 ② 1100 ③ 1700 ④ 18700
11. दोन क्रमवार विषम संख्यांचा लसावी 225 आहे; त्या दोन विषम संख्यांच्या दरम्यान असलेली सम संख्या कोणती?
① 14 ② 16 ③ 18 ④ 12
12. दोन संख्यांचा गुणाकार 550 आहे; त्यांचा मसावी 5 असल्यास त्या संख्यांचा लसावी किती?
① 100 ② 55 ③ 110 ④ 25
13. क्रीडांगणावर इयत्ता 3 वी चे 55 विद्यार्थी, इयत्ता 4 वी चे 40 विद्यार्थी व इयत्ता 5 वी चे 30 विद्यार्थी आहेत. कवायतीसाठी प्रत्येक ओळीत समान विद्यार्थी घेतल्यास एका ओळीत जास्तीत जास्त किती विद्यार्थी असतील?
① 5 ② 10 ③ 15 ④ 3
14. दोन क्रमवार सम संख्यांचा लसावी 1012 आहे व मसावी 2 आहे; त्या दोन संख्या कोणत्या?
① 40 व 42 ② 44 व 46 ③ 42 व 44 ④ 46 व 48
15. ज्या दोन संख्यांचा मसावी 6 व लसावी 252 आहे तर त्या दोन संख्या कोणत्या?
① 36 व 42 ② 40 व 47 ③ 36 व 40 ④ 42 व 44

शिष्यवृत्ती परीक्षा सातवी सराव पेपर सोडवण्यासाठी खालील वेबसाईटला भेट द्या.

Visit https://learningwithsmartness.in/

NAVNTAH MOHAN LAD

https://learningwithsmartness.in/